**<u>वादीतर्फे पुढील सरतपास विधिज्ञ श्री.एम.बी.सुकाळी यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१२. मी अभिलेखावर पंचयादी दाखल केलेली आहे. ती पंचयादी दाखविल्यास मी ओळखू शकतो. सदर पंचनाम्यामध्ये पंच म्हणून कमलेश काशिनाथ मांजरेकर, चेतन एकनाथ पाटकर व दिपक एकनाथ मांजरेकर हे होते. ती पंचयादी तीच आहे. सदर पंचनामा मी करुन घेतलेला आहे. सदर पंचनामा हा नि.क्र.४/३ कडे दाखल केलेला आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. यु.बी.कुळकर्णी यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१३. ज्या मिळकतीसंदर्भात दावा दाखल केला आहे त्या मिळकतीबद्दल मला ३५ वर्षापासून माहिती आहे. माझा जन्म १९७७ सालचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची मला ३५ वर्षापासून माहिती आहे हे मी खोटे सांगत आहे. मला दावा मिळकतीची प्रत्यक्ष पाहणीतून माहिती आहे. दावा दाखल करताना दावा मिळकतीच्या लगत धारक कोण आहेत याची मला माहिती होती. मी दावा दाखल करताना दावा मिळकतीच्या चतु:सिमेच्या लगत कोणाकोणाची वहिवाट आहे हे नमूद केलेले आहे. मी दावा व प्रतिज्ञापत्रामध्ये चतु:सिमेच्या वहिवाटदारांची नावे नमूद केली होती. तसे प्रतिज्ञापत्र मी न्यायालयाला दाखवू शकतो. दावा मिळक्तीच्या पुर्वेस कोणाची वहिवाट आहे मी प्रतिज्ञापत्र व दाव्यामध्ये नमूद केले होते. तसेच दावा मिळकतीच्या पश्चिमेस कोणाची वहिवाट आहे हे मी प्रतिज्ञापत्र व दाव्यामध्ये नमूद केले होते. दावा मिळकतीच्या पश्चिमेस संभाजी पाटील यांची मिळकत किती फूट दावा मिळकतीला लागून आहे हे मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीच्या उत्तरेला चंद्रहास पाटकर यांची मिळकत व दक्षिणेला पोयरेकर यांची मिळकत दावा मिळकतीला किती फूट लागून आहे हे मला सांगता येणार नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची मला लांबी रुंदी सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बराचशा जमिनी कामत यांच्या जमिनीस कुळ लावून विक्री करुन घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कामत कुटूंबिय हे दावा मिळकत असलेल्या गावात राहत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्या जमिनीची विक्री करण्यात आली त्यावेळी

कामत कुटूंबिय जिल्हयाच्या बाहेर होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही लबाडीने कामत कुटूंबियाच्या जमिनींना कूळ म्हणून नाव लावून घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझी व माझ्या वडीलांची कुळ म्हणून कधीही वहिवाट नव्हती. मी दावा मिळकतीचा १९५७ पासून ७/१२ पाहिलेला आहे. सदर दावा मिळकतीची विक्री आम्हाला कूळ कायद्याने झालेली आहे. दावा मिळकतीचा कूळपणाचा करार शांताराम कामत व श्रीधर घनश्याम हडकर यांच्यामध्ये झाला होता. कुळपणाचा करार जमिन मालक व माझे पुर्वाधिकारी यांच्यामध्ये झाला होता किंवा कसे हे मला माहित नाही. कुळपणाचा करार जमिन मालक व माझे पुर्वाधिकारी यांचेमध्ये झाला होता हे मी खोटे सांगितले नाही. कुळपणाचा करार झाला होता तो करार मी हजर करु शकतो. त्या कराराची तारीख महिना व साल मला सांगता येणार नाही. त्या करारामध्ये ठरलेल्या अटी काय होत्या हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीबद्दल कुळपणाचा करार जमिन मालक व माझे पुर्वाधिकारी यांच्यामध्ये झाला होता हे मी खोटे सांगत आहे.

१५. आम्ही दावा मिळकत कसण्यासाठी १/०४/१९५७ च्या पुर्वी घेतली होती. आमची नावे सन १९५७ साली पिकपाहणी सदरी दाखल होती हे दाखविण्यासाठी मी अभिलेखावर ७/१२ व फेरफार दाखल करु शकतो. माझे पुर्वाधिकारी श्रीधर घनश्याम हडकर यांनी दावा मिळकतीला कुळ म्हणून नाव लावण्यासाठी सन १९६३ साली अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या ७/१२ मध्ये ०१/०४/१९५७ साली आमचे नाव कुळ म्हणून नसल्याने आम्ही सन १९६३ मध्ये कुळ म्हणून नाव लावण्यासाठी खोटा अर्ज केला. मी दावा मिळकतीच्या संदर्भात खंडाच्या पावती दाखल करु शकतो. ( The learned advocate for the plaintiff raised objection to the question put by the learned advocate Shri. Kulkarni to the witness regarding tenancy right. It is submitted by advocate shri. M.B.Sukali that there is no pleading to that effect. Therefore, such question can not be put to the witness. As against this learned advocate Shri. Kulkarni submitted that in para no. 4 of his written statement there is a reference of tenancy right. Therefore, the question put to the witness is relevant. Heard both sides. Present suit is for permanent injunction. In a suit for permanent injunction

plaintiff must prove his possession over the suit property. The question putforth by the leanred advocate for the defendant is in respect of the possession of the plaintiff and his predecessor. Therefore, the question are very much relevant to the fact of the case. Hence, objection is rejected.) खंडाच्या पावत्या कधीपासून कुठपर्यंत आहे हे मला सांगता येणार नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये चंद्रहास रामचंद्र पाटकर यांचे आजोबा अर्जुन सखाराम पाटकर यांच्यापासून त्यांची अखंड कुळ वहिवाट चालत आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझी व माझे पुर्वाधिकारी यांची कधीही वहिवाट नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीला आम्ही कधीही कुळ नसताना बेकायदेशीर कुळ म्हणून नाव लावून बेकायदेशीर विक्री करुन घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिन ही शेत जमिन नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीला शेत जमिनीची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये १९५७ पासून आजपर्यंत कधीही भातशेती केलेली नाही. दावा मिळकतीमध्ये भातशेती होत होती हे दाखविण्यासाठी आज माझ्याकडे ७/१२ नाही. आम्ही माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये भातशेती करत होतो.

१७. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या चारही बाजूस कुंपण होते असा मजकूर दाव्यात नमूद नाही. मी दाव्यात दावा मिळकतीला चारही बाजूने कुंपण आहे असे दाखवू शकत नाही. मी दावा मिळकतीच्या पश्चिमेस पुर्वेस, उत्तरेस दक्षिणेस किती लांबी रुंदीचे कुंपण होते हे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीला मुळात कुंपण नसल्याने मी तसे दाव्यामध्ये नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ साली दावा दाखल करताना दावा मिळकतीला कुंपण होते हे दाखविण्यासाठी माझ्या शब्दाशिवाय पुरावा नाही. दावा मिळकतीमध्ये कोणत्या प्रकारची किती झाडे आहेत हे दाव्यामध्ये नमूद नाही. सदर बाब दाव्यामध्ये नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६

वर दाखल असलेल्या ७/१२ मध्ये कोणत्याही झाडाची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करताना दावा मिळकतीमध्ये झाडे होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करताना दावा मिळकतीमध्ये झाडे होती हे दाखविण्यासाठी माझ्याकडे शब्दाशिवाय पुरावा नाही.

१८. दि. १२/०१/२०१७ रोजीच्या घटनेच्या वेळी दावा मिळकती एकूण तीन माणसे होती. त्या ठिकाणी मी व नारिंग्रेकर व त्यांचे दोन मजूर होते. सन २०१७ साली माझ्याकडे मोबाईल होता. घटनेची माहिती मी मोबाईलवरुन पोलीस स्टेशनला कळविली नव्हती. नारिंग्रेकर यांच्यासोबत दोन व्यक्ती कोण होते हे मी सांगू शकत नाही. सदर दोन्ही व्यक्ती आमच्या गावातील नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे दि. १२/०१/२०१७ रोजीची कधीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२/०१/२०१७ रोजीच्या घटनेबद्दल माझ्या शब्दाशिवाय माझ्याकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १२/०१/२०१७ रोजी माझे व इंद्रनिल मध्ये कोणतेही संभाषण झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये लिहिलेले इंद्रनिल व माझ्यामध्ये झालेले संभाषण खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १२/०१/२०१७ रोजी प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये गेलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी अगर त्यांच्यासोबत कोणीही दावा मिळकतीमध्ये झाडे तोडण्यासाठी गेलेले नव्हते. प्रतिवादींनी चार काजूची झाडे व तीन आकाशीची झाडे तोडली होती. मी दाव्यात व सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये आकाशीची आणि काजूची किती झाडे तोडली होती हे नमूद केले होते. साक्षीदार सरतपासाच्या प्रतिज्ञापत्र पाहून सांगतो की, त्यामध्ये काजूची किती झाडे आकाशी किती झाडे तोडली याचे आकडे लिहिलेले नाहीत.

१९. झाडाच्या कुंपणाला इमारतीसाठी लागणाऱ्या झाडांची लागवड करतो. हे म्हणणे खरे आहे की, वेगवेगळया जिवंत झाडांचे कुंपण करतो. दाव्यात व सरतपासामध्ये कोणत्या झाडाचे कुंपण होते हे नमूद केलेले नाही. सदर बाब नमूद करण्यास कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मुळातच झाडाचे कुंपण नसल्याने तशी बाब नमूद केलेली नाही.

ज्यावेळेस दाव्यात नमूद पंचनामा करण्यात आला त्यावेळीस आमच्या गावात पोलीस पाटील होते. त्यावेळेस ग्रामपंचायतचे सरपंच व सदस्य कार्यरत होते.

प्रश्न - ज्यावेळेस तुम्ही कथी पंचनामा करुन घेतला त्यावेळेस तो पंचनामा पोलीस पाटील, सरपंच व सदस्य यांच्या उपस्थित का केला नाही ?

उत्तर - मी पोलीस पाटील यांना सांगितले होते परंतु त्यावेळस ते आले नाही. त्यानंतर परत पोलीस पाटील यांना दि. ०६/०२/२०१७ रोजी लिखीत कळविण्यात आले, परंतु ते पंचनाम्यासाठी आले नाहीत.

२०. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझ्या सांगण्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नसल्याने पोलीस पाटील बोगस पंचनामा करण्यासाठी आले नव्हते. पोलीस पाटील पंचनाम्यासाठी आले नव्हते म्हणून त्यांची तक्रार मी त्यांच्या वरिष्ठांकडे केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटीलांना पंचनाम्यासाठी बोलविले होते व ते आले नाही हे मी खोटे सांगत आहे. मी सरपंच व सदस्य यांचेकडून पंचनामा करुन घेतला नाही कारण पोलीस पाटील पंचनाम्यासाठी आले नाहीत म्हणून मी सरपंच व सदस्य यांचेकडे गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील पंच हे माझ्या नेहमीचे बैठकीचे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याचा गैरवापर करुन खोटा पंचनामा तयार केला.

२१. माझ्या म्हणण्याप्रमाणे झाडांची तोड कुऱ्हाड व कोयत्याने केली. असा मजकूर मी माझ्या दाव्यात व सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केलेला नाही. सदर बाब माझ्या दाव्यात व शपथपत्रामध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये झाडांची तोडझाड ज्या जेसीबीने करण्यात आली होती त्या जेसीबीचा क्रमांक व मालक व चालक कोण होते याची माहिती दाव्यामध्ये नमूद नाही. सदर जेसीबी चालक व मालक यांच्या विरुध्द मी पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली नाही. अशी तक्रार देण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. दावा मिळकतीमधील माझ्या शांततामय कब्जास प्रतिवादींनी हरकत केली होती असे दाखविण्यासाठी माझ्या शब्दाशिवाय पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीची त्याच्या मिळकतीमध्ये त्याची वहिवाट सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी दावा मिळकतीवर कधीही स्वत:चा हक्क सांगितलेला नाही. प्रतिवादींनी दावा

मिळकतीवर त्याचा हक्क सांगितला हे दाखविण्यासाठी माझ्याकडे माझ्या शब्दाशिवाय पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १२/०१/२०१७ साली कोणतीही घटना न घडता दावा मिळकतीमध्ये चंद्रहास पाटकर वगैरे यांच्यावर दबाव टाकण्यासाठी मी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी किंवा त्याच्या कामगारांनी दावा मिळकतीमधी कोणतीही झाडे अगर कुंपण तोडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अभिलेखावर खोटा पंचनामा व खोटे फोटोग्राफस दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने दावा मिळकतीसंदर्भात तुम्हाला कोणतीही हरकत केलेली नाही अगर तुमचा नागरी हक्क दुखावला जाईल असे कोणतेही कृत्ये केलेले नसल्योन त्याचेविरुध्द कोणतीही मनाईची दाद मागता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझे कुंपण व झाडे तोडून माझे ₹ ५०००/- चे नुकसान केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुळात माझा दावा खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यात सांगितल्याप्रमाणे मी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला त्रास देण्यासाठी खोटा व खोडसाळ दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात केलेल्या मागणीप्रमाणे कोणत्याही मागणीस पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह
दि. २८-१०-२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.